**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:02.02.2025** **वार : रविवार**

---

**ठळक बातम्या**

- गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांना प्राधान्य देणारा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याद्वारे लोकसभेत सादर.

- नवीन कर रचनेनुसार 12 लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न आयकरातून सूटपात्र.

- अर्थसंकल्पात राज्याला मोठ्या प्रमाणात निधी; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडून अर्थसंकल्पाचं स्वागत. आणि

- भारत आणि इंग्लंड वीस षटकांच्या मालिकेत आज मुंबईत पाचवा आणि अंतिम सामना

**अर्थसंकल्प**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 2025-26 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प काल लोकसभेत सादर केला. यामध्ये गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांना प्राधान्य दिलं जाणार आहे. आर्थिक वृद्धीला चालना, सर्वंकष विकास, खासगी क्षेत्राच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन, सर्वसामान्यांच्या आकांक्षांना उभारी देणारा आणि मध्यमवर्गाला आणखी बळकट करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. ऐकुया या संदर्भातील अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून ..........

**हा अर्थसंकल्प कर निर्धारण, ऊर्जा, शहरी विकास, खाणकाम इत्यादि क्षेत्रात सुधारणा घडवून आणणारा आहे असं सांगताना अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी पुढच्या आठवड्यात नवीन आयकर विधेयक आणण्याची घोषणा काल केली. कर परतव्याच्या सोयीमुळे 12 लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना नवीन कर रचनेनुसार कुठलाही आयकर द्यावा लागणार नसल्याने मध्यमवर्गीयांना दिलासा मिळाला असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त केली जात आहे. तर 18 लाख रुपये उत्पन्नधारकांना 70 हजारांचा फायदा होणार आहे. 25 लाख रुपये उत्पन्न असलेल्यांचा कर 1 लाख 25 हजारांनी कमी होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा 50 हजारांहून 1 लाख करण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. कर्करोग आणि इतर गंभीर आजारांवरील 36 जीवनावश्यक औषधांवरील सीमाशुल्क संपूर्ण माफ केल्यानं ही औषधे स्वस्त होणार आहेत. देशभरातल्या शंभर आकांक्षित जिल्ह्यांमध्ये राज्यांच्या सहकार्याने प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना राबवणार असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. त्याचबरोबर किसान क्रेडिट कार्डद्वारे साडे सात कोटींपेक्षा जास्त शेतकरी, मच्छिमार आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना अल्प मुदतीचं कर्ज उपलब्ध करून**

**दिलं जाणार आहे. ग्रामीण समृद्धी आणि लवचिकता कार्यक्रमाद्वारे याद्वारे कृषी क्षेत्रातल्या बेरोजगारांना कौशल्य, तंत्रज्ञान पुरवलं जाणार असून याचा फायदा महिला, तरुण शेतकरी, ग्रामीण युवक, अल्पभुधारक यांना होणार आहे.केंद्रीय अर्थसंकल्प हा मध्यमवर्गीयांसाठी 'ड्रीम बजेट' असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. हा अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड ठरेल. यामधून शेतकऱ्यांना निश्चितच अधिक उत्पादन मिळणार असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. या अर्थसंकल्पातून राज्याला मोठा विकासनिधी मिळाल्यानं पायाभूत प्रकल्पांची पायाभरणी आणि विकासाला चालना मिळेल अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, विद्यार्थी सर्व घटकांना विकासाची संधी देणारा, सामान्य माणूस केंद्रस्थानी असलेला हा अर्थसंकल्प असल्याचं सांगून त्यांनी स्वागत केलं आहे. सरकारी शाळांमध्ये 5 लाख अटल टिंकरिंग लॅब स्थापन करणं, शाळा आणि आरोग्य केंद्रांना ब्रॉडबँड सेवा पुरवणं, भारतीय भाषांमध्ये पुस्तकं उपलब्ध करुन देणं, आयआयटी तसंच वैद्यकीय महाविद्यालयांमधील विद्यार्थीसंख्या आणि सुविधा वाढवण्याचा फायदा राज्यातील युवकांना निश्चितपणे होईल असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातून राज्याला एमयुटीपी-3 प्रकल्पासाठी 1 हजार 465 कोटी 33 लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. पुणे मेट्रोसाठी 837 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुळा मुठा नदी संवर्धनासाठी जायकांतर्गत 230 कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न करण्यापासून तर उत्तम आरोग्य सुविधा, लघु उद्योगांचे सक्षमीकरण, विमा क्षेत्रातील गुंतवणूक आणि निर्यात धोरण या सर्व बाबींवर विशेष लक्ष देण्यात आलं असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. अर्थसंकल्प सादर करताना शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही आणि शेतमालाच्या हमीभावाबदद्लही काहीच नसल्याची टीका महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. या अर्थसंकल्पात कुठेही शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राशी निगडीत मोठ्या कल्पना मांडण्यात आल्या नाहीत. बेरोजगारीवर उपाय नसल्याचं माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रतिक्रिया देताना हा अर्थसंकल्प निराशा करणारा असून कॉँग्रेस पक्ष याचा निषेध करत असल्याचे ते म्हणाले. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.**

**रेल्वे अर्थसंकल्प**

2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात रेल्वे मंत्रालयासाठी 2 कोटी 55 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी 3445 कोटी रुपये महसूलावर आणि 2 लाख 52 हजार कोटी रुपये भांडवली खर्चावर खर्च केले जातील. अशाप्रकारे, रेल्वे अर्थसंकल्पात एकंदर 2 लाख 55 हजार 445 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**प्रतिक्रिया अर्थसंकल्प**

2025-26 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी काल लोकसभेत सादर केल्यानंतर सर्व स्तरांतून त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. या संदर्भात मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजचे महासंचालक प्रशांत गिरबाने आकाशवाणीशी बोलताना म्हणाले ...

गरीब या सोबतच महिला आणि शेतकरी यांवर खूप लक्ष देण्यात आले आहे बजेट मध्ये यावेळी मुख्य प्रामुख्याने लक्ष द्यायला हव की 12 लाख पर्यंत ज्यांचे इनकम आहेत किंवा 12.75 पर्यंत ज्यांचे इन काम आहेत त्यांना कुठला ही कर भरावा लागणार नाही म्हणजे काय तर यामुळे कनझमशन हे वाढेल त्यामुळे आपला GDP वाढेल , तर ही एक चांगली तरतूद आहे. पर्यटनामध्ये ही त्यांनी सांगितलं 50 वेगवेगळे केंद्र देशभरात जे महाराष्ट्रात भरपूर

येतील त्यातले केंद्र ती विकसित केली मुद्रा लोन चा फायदा जातील लघु उद्योगाकांना होतो अशी भरीव तरतूद केली आहे तर अस सर्वार्थाने जर पाहिलं तर याला एक चांगल प्रोजेक्ट म्हणावं लागेल.

या अर्थसंकल्पाबाबत पंढरपूर तालुक्यातील अजनसोंड इथले शेतकरी संतोष कवडे आकाशवाणीशी बोलताना म्हणाले. . . . . . .. .

**शेतकऱ्याला देशाचा कणा म्हणत्यात पण शेतकरी अन मध्यमवर्ग ह्यांच्यासाठी ठोस असं कायतरी ह्या बजेट मदी पायजे हुतं पण नुसत्या लोकांला आवडतंय म्हनून घोषणा केल्यासारख दिसतय. पण शेतकऱ्याचं उत्पन्न वाढावं , सर्व सामान्य मानसाची महागाईपासून सुटका म्हणून यात काय केल्याचं दिसत न्हाय.**

तर पुण्यातील गृहिणी प्रिया जोशी अर्थसंकल्पाबाबत म्हणाल्या.. . . . . .

**खरं तर या अर्थसंकल्पाने शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा, नव उद्योजक, नोकरदार या सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्र सरकार शेतकऱ्याला केंद्रबिंदू माणून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबूत करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेले निर्णय निश्चितच समाधानकारक आहेत. शेती क्षेत्राच्या विकासासाठी आणलेल्या धनधान्य कृषी विकास योजनेचा अनेकांना फायदा होणार आहे. डाळींचे उत्पन्न वाढवण्यासाठी तसेच कापूस उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत ही बाब स्वागतार्ह आहे. करपात्र उत्पन्नाची मर्यादादेखील 7 लाखावरून 12 लाखापर्यंत नेण्यात आल्याने कुठलाही टॅक्स भरावा लागणार नाही ही दिलासादायक गोष्ट आहे.**

**एनसीसी**

नवी दिल्ली इथं प्रजासत्ताक दिन शिबिरामध्ये वैयक्तिक तसेच सांघिक पारितोषिकं प्राप्त करणाऱ्या महाराष्ट्र एनसीसीच्या छात्रांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल राजभवन इथं निमंत्रित करून शाबासकी दिली. तसंच विविध जिल्ह्यांमधील प्रशिक्षकांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्र एनसीसी आजही देशात सर्वोत्कृष्ट असल्याचं कौतुक राज्यपालांनी यावेळी बोलताना केलं.

**पक्षीसंमेलन**

निसर्गाच्या संतुलनात पक्ष्यांची भूमिका महत्त्वाची आहे, त्यांच्या अधिवासाचा ऱ्हास माणसामुळे होतो. पक्षी मात्र सर्वांचा विचार करतात हे मानवाने शिकण्याची गरज असल्याचंच मत पुण्यातील जेष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. प्रवीण सप्तर्षी यांनी मांडले. ते काल शेवगाव इथं 37 व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना “ पाणथळी आणि पाणपक्षी “ अशी आहे. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल माळी यांनी पक्षी संवर्धनासाठी आवश्यक नियमावली कऱण्याविषयी भाष्य केले. आज या संमेलनाचा समारोप होत आहे.

**विश्वमराठी**

न्यायालयानं दिलेल्या निकालांचे मराठीतलं भाषांतर त्वरीत करण्यासाठी मराठी भाषा विभागानं अधिकृत भाषांतर करणारी यंत्रणा मजबूत करावी अशी सूचना विधान परिषदेच्या उपसभापति डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. पुण्यात सुरू असलेल्या विश्व मराठी संमेलनात काल महिला कायदा आणि महिलांना न्याय या विषयावर आयोजित परिसंवादात त्या बोलत होत्या. तर, प्रशासनातली मराठी भाषा या विषयावरील परिसंवादात, कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून सामान्य नागरिक आणि प्रशासनातील मराठी भाषा यांच्यातली दरी दूर करता येईल असं मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सांगितलं. प्रशासनातील मराठी भाषा समृद्ध होताना ती

लोकप्रशासनाची भाषा झाली पाहिजे अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. संमेलनाचा आजचा शेवटचा दिवस आहे.

**जीबीएस**

गुइलेन बॅरी सिंड्रोम या आजाराची राज्यातील एकंदर रुग्णसंख्या 149 झाली आहे. यापैकी 28 रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. तर आतापर्यंत पाच रुग्णांचा जीव गेला आहे.  या आजारानं नागपूर, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातही शिरकाव केला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील वीस षटकांच्या मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज मुंबईत वानखेडे मैदानावर होणार आहे. भारताने या मालिकेत 3-1 अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**